## महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 393 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 28 / 10 / 2024

---

# 1)खुनाचा प्रयत्न :–

**हिमायतनगर :–** दिनांक 26.10.2024 रोजी 04.00 वा. ते 04.15 वा. चे दरम्यान, **एस.एस.टी. पॉईंट वाशी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे **1. शेख शैकत शेख मिया, वय 30 वर्षे, 2. शेख सायबन अब्दुल, वय 34 वर्षे 3. शेख सिद्दीकी शेख नन्नू, वय 40 वर्षे 4. शेख जावेद शेख इमाम, वय 20 वर्षे सर्व रा. ढाणकी ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी संगणमत करून फिर्यादी हे एस.एस.टी. पॉईंट वाशी ता. हिमायतनगर येथे कर्तव्यावर हजर असताना आरोपीतांनी त्यांचे ताब्यातील बोलेरो पिकअप क्रमांक एम.एच.–29 / बीई–2463 किंमती 2,50,000 / –रूपयाची मध्ये गोवंश जातीची जनावरे किंमती 40,000 / –रूपयाचे तस्करी करून निर्दयपणे वाहनांमध्ये कोंबून घेवून जात असताना त्यांना नाकाबंदी दरम्यान थांबण्याचा इशारा केला असता आरोपीतांनी त्यांची दोन मोटार सायकल किंमती 1,30,000 / –रूपयाच्या व बोलेरो पिकअप टेम्पो भरधाव वेगाने चालवून कर्तव्यावर असलेले फिर्यादी यांना जिवे मारण्याचे उद्देशाने त्यांच्या अंगावर घालून खुन करण्याचा प्रयत्न केला तसेच शासकीय कर्तव्यापासून धाक दाखवून प्रवर्त करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला तसेच जोराने बॅरिकेटिंगला धडक मारून बॅरिकेटचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ / 992 अतिश सुर्यकांतराव राचेलवार, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 258 / 2024 कलम 109,121(1),324(4),3(5) भारतीय न्याय संहिता–2023 सह कलम 13,11(1)(अ)(ई)(फ) प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध कायदा 1960 प्राणी संरक्षण अधिनियम कलम 5(अ),5(ब) सह कलम 47(अ),48,50,56(सी) सह कलम 125 मो.वा.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि / श्री अमोल भगत, मो.क्रं. 9821869688** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 23.10..2024 रोजी 08.00 वा. ते दिनांक 26.10.2024 रोजी 22.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी देवराव नगर गुरूजी चौक, पुर्णा रोड नांदेड येथे,** कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घरात प्रवेश करून देवघराचे ड्रॉव्हर मधील चावीने कपाट उघडुन कपाटात ठेवलेले सोन्या,चांदीचे दागिणे असा एकुण किंमती 4,06,500 / –रूपयाचा ऐवज चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अनिरूध्द शामसुंदर चुनुकवार, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. देवराव नगर गुरूजी चौक, पुर्णा रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 536 / 2024 कलम 305, 331(3),331(4),305 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2364, श्री कुकडे, मो.नं. 7719068799** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 26.10..2024 रोजी 21.00 वा. ते दिनांक 27.10.2024 रोजी 10.00 वा. चे दरम्यान, **हरीओम नागरी पतसंस्था विनकर वसाहत ज्ञानेश्वर मंदिरा जवळ, नांदेड येथे,** कोणीतरी अज्ञात चोरटयाने पतसंस्थेचे लोखंडी चॅनलगेट वाकवुन आत प्रवेश करून एक मॉनिटर (स्क्रीन) किंमती 7000 / –रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नागेश गोविंद कोकुलवार, वय 28 वर्षे, व्यवसाय नगरसेवक रा. न्यायनगर कौठा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 396 / 2024 कलम 305(इ),334(1) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 664,श्री हाके, मो.नं. 8380000664** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**सिंदखेड :–** दिनांक 20.10.2024 रोजी ते 27.10.2024 03.00 वा. चे दरम्यान, **मौ. दहेलीगाव शेतशिवार ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे 1. वनदेव गणेश कचरे 2. प्रकाश गणेश कचरे 3. रमेश गणेश कचरे 4. संतोष प्रकाश कचरे रा. सर्व दहेली ता. किनवट जि. नांदेड या आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे शेतातील कापुस 10 क्विंटल किंमती 60,000 / –रूपयाचा वेचुन चोरून नेले. वगैरे **फिर्यादी तुळशीराम नामदेव पारसकर, वय 82 वर्षे, व्यवसाय शेती रा. दहेली ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 128 / 2024 कलम 303(2),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना / 2188 कोंडापलकुलवार, मो.नं. 9923794742** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :–

**इस्लापूर :–** दिनांक 26.10.2024 रोजी 23.00 वा. ते दिनांक 27.10.2024 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **मौजे इस्लापूर फिर्यादीचे राहते घरासमोर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घरासमोर बांधलेले एक गाय किंमती 25,000/–रूपयांचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण गंगाधर सिंगनवाड, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. इस्लापूर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापूर** गुरनं 143/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/805 अकलोली, मो.क्रं. 9552526246** हे करीत आहेत.

## 5)अवैध गुटखा बाळगला :–

**माहुर :–** दिनांक 26.10.2024 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **महाराष्ट्र गोळी भांडार शिवाजी चौक, माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे तोफीक खान महेबुब खान, वय 36 वर्षे, रा. मोमीनपुरा, माहुर ता. माहुर जि. नांदेड यांने स्वतःचे आर्थीक फायदयासाठी बिना परवाना बेकायदेशिररित्या शासनाने प्रतिबंध केलेला सुंगधीत तबांखु व विविध कंपनीचा पानमसाला किंमती 1,65,680/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/माधव नामदेव केंद्रे, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 144/2024 कलम 123, 274 ,275, 223 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा सह 30(2),(अ), 59 (आयव्ही) अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 नियम 2111 चे कलम 26 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री ब्राम्हण मो.क्रं. 9921235344** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 27.10.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **मौ. बाऱ्हाळी प्रकाश नगर ता. मुखेड जि. नांदेड येथे** यातील महिला आरोपी नामे कमलाबाई व्यंकट पवार, रा. प्रकाश नगर बाऱ्हाळी ता. मुखेड जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 3,000/– रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2319 सुभाष मनमथआप्पा सिध्देश्वरी, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 232/2024 कलम 65(ई) मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शेख, मो.नं. 8421537419** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :–** दिनांक 27.10.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **नंदीनगर जाणारे रोडवर मौलाना दर्गा जवळ मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे यल्लाप्पा मुंजाजी साखरे, वय 35 वर्षे रा. शिवाजीनगर मुदखेड जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी दारू किंमती 3,500/– रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/699 रमेश दादाराव पुणेबोईनवाड, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 222/2024 कलम 65(ई) मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1375 ठाकुर, मो.नं. 7774051375** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**विमानतळ :–**दिनांक 27.10.2024 रोजी 00.40 वा. चे सुमारास, **सखोजीनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे 1. संजय निवृती गोरे वय 43 वर्षे रा.शिवनगर नांदेड 2. शेख मुख्तार शेख अख्तर वय 46 वर्षे रा.गोविंदनगर नांदेड 3. शेरखान बिस्मीला खान पठाण, वय 38 वर्षे रा. वाजेगाव नांदेड 4.शेख महेबुब शेख ईसाब, वय 40 वर्षे रा. देगलुर नाका, नांदेड यांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या रम्मी हार जीत नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 24,160/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले.वगैरे **फिर्यादी पोकॉ/555 राजेश जळबा माने, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 437/2024 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ 721 जावेद, मो.नं. 99235881177** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :–

**देगलुर :–**दिनांक 27.10.2024 रोजी 20.15 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहते घरी देगाव रोड लाईनगल्ली, देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे शेख गौस शेख आजम, वय 30 वर्षे रा. देगाव रोड लाईनगल्ली, देगलुर जि. नांदेड याने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/580 कृष्णा गंगाराम तलवारे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 506/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/647 मरगेवाड, मो.क्रं.86600733027** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :–

**हिमायतनगर** :–दिनांक 26.10.2024 रोजी 18.00 वा. चे पुर्वी, **वाई शिवारात तळयाचे पाण्यात ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे रामराव यादव बर्डे, वय 53 वर्षे, रा. वाई ता. हिमायतनगर जि. नांदेड** हा नापीकीला कंटाळुन व बॅकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेत तळयाच्या पाण्यात उडी मारून पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार मारोती सटवाजी बर्डे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाई ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **33/2024** कलम 194 भारतीय नागरीक संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2204 पाटील, मो.नं. 9765999899** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड